स्थापना : १९८४ इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे वर्ष : ३५ वे

# कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

कळंब-वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे - ४१३ ११४.

पुणे विद्यापिठ संलग्नित

IDNO-PU/PN/AC/056/(1984) **नॅक नामांकन** ,B

## माहिती पत्रक - सन २०१८ - २०१९


दूरध्वनी : कार्यालय : (०२११८) २५२३०१, २५२१८४.
प्राचार्य निवास : (०२११८) २७२३६०, फॅक्स : (०२११८) २५२१८४.
E-mail :- artsandcommerce_college@yahoo.com
विद्यापिठ वेबसाईट :– htpp://www.unipune.ernet.in

किंमत : ५० रूपये

# इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान

मु. पो. निमसाखर, ता. इंदापूर, जि. पुणे.

* आमचे प्रेरणास्थान *



* संस्थापक-अध्यक्ष *

## कै. विश्वासराव कृष्णाजी रणसिंग

## * प्रास्ताविक *

"इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान" या स्वयंसेवी संस्थेने शिक्षण हा विकासाचा पाया आहे हे ओळखून १९८४ साली कळंब-वालचंदनगर येथे "कला आणि वाणिज्य महाविद्यालय" या ज्ञानमंदिराची स्थापना केली. पाहता पाहता ३४ वर्ष पार पडली व या वर्षी हे महाविद्यालय ३५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या पदार्पणातच या वर्षापासून विज्ञान विद्या शाखा सुरू होत आहे.

आपल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. विश्वासराव कृष्णाजी रणसिंग यांचे या परिसराची गरज म्हणून विज्ञान विद्याशाखा सुरु करावी हे स्वप्न होते व ते साकार होत आहे. हे नमुद करताना आम्हाला अभिमान वाटतो.

महाविद्यालयाचे हे शैक्षणिक वर्ष १८ – १०१९ दि. १६ जून २०१८ १५ रोजी सुरु होत आहे. महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय, त्याची प्रवेश पात्रता, परीक्षा पध्दती, वर्तनुकीचे नियम, शुल्क रचना या बरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविले जाणारे विविध उपक्रम याबाबतची माहिती ज्ञात व्हावी या उद्देशाने ही माहिती पुस्तिका प्रकाशीत करीत आहोत.

महाविद्यालयाच्या आत्तापर्यंतच्या वाटचालीचे अवलोकन केल्यास उच्च दर्जाची गुणवत्ता व सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास याचा प्रत्यय येतो. परीक्षेतील यशाबरोबरच कला क्रीडादी क्षेत्रातीलं स्पृहनिय यश प्रगतीचा आलेख दर्शविते. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची विविध क्षेत्रातील नेत्रदिपक कामगिरी ही आपल्या उज्वल यशस्वीतेची परीमाणे आहेत असे आम्ही मानतो.

समृध्द ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा आहे व म्हणूनच आपण ग्रंथालय समृध्दतेकडे विशेष लक्ष दिले आहे. महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेऊन नॅक ने महाविद्यालयास B हा दर्जा दिला आहे व पुनर्मूल्यांकनाची प्रक्रिया चालू आहे.

महाविद्यालयाची ही यशस्वी घोडदौड ज्यांच्यामुळे होत आहे त्यांचा ऋणनिर्देश या ठिकाणी व्यक्त करावासा वाटतो समाजहितदक्ष संस्था चालक, कार्यक्षम व कुशल अध्यापक, कार्यतत्पर शिक्षकेतर कर्मचारी व विशेषतः शिक्षणाचा ध्यास असणारा विद्यार्थी वर्ग यांच्या अथक परीश्रमातूनच ध्येय पूर्तीची वाट्याल चालू आहे. समाजाचा आमच्या वरील विश्वास हा या ध्येयपूर्तीचा आधार आहे. समाजहिताची जाणिव ठेवून विविध शैक्षणिक व शिक्षण पूरक सामाजिक उपक्रमांचा संकल्प पुर्णत्वास नेण्यास आम्ही कटीबध्द आहोत.

## ※ महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये ※

१) नॅक (NAAC) कडून ' B ' मानांकन.
२) कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी पर्यंतच्या अध्ययनाची सुविधा.
३) विविध विषयाची उपलब्धता, त्यामुळे विषय निवडीला अधिक वाव.
४) अनुभव संपन्न व व्यासंगी प्राध्यापक वर्ग.
५) विद्यापीठ परीक्षांचा उत्कृष्ठ निकालाची दीर्घ परंपरा.
६) वाणिज्य शाखेत मराठी व इंग्रजी माध्यमातून अध्यापनाची सुविधा.
७) सुसज्ज ग्रंथालय.
८) केंद्रीय संगणक लॅबची सुविधा.
९) प्रशस्त क्रिडांगण.
१०) योगाभ्यासाची सोय आणि योगाभ्यास केंद्राची स्थापना.
११) राष्ट्रीय सेवा योजना.
१२) कमवा – शिका योजना.
१३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन.
१४) सामान्य ज्ञान परीक्षा व प्रश्न मंजुशेचे आयोजन.
१५) विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रम.
१६) कॉम्प्युटर, टि.व्ही., सिडी प्लेअर, एल.सी.डी. इत्यादी शैक्षणिक साधनांची सोय.
१७) गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार.
१८) विविध प्रकारच्या शिष्यवृत्या व फ्रिशिप्स.
१९) शाळा महाविद्यालय समुह योजना.
२०) समर्थ भारत अभियान.
२१) सॉफ्टस्कील डेव्हलमेंट प्रोग्रॅम.
२२) उद्योजकता विकास योजना.

टिप :- कॅश व्यवहार फक्त १०.३० ते १.३० या काळातच होईल.
कार्यालयीन वेळ सकाळी १० ते ५ वा. पर्यंत.

## * प्रवेश पात्रता *

### * प्रथम वर्ष कला :-

या वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता १२ वी परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. किंवा पुणे विद्यापीठाने मान्य केलेल्या अन्य विद्यापीठाची किंवा अन्य मंडळाची समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### * द्वितीय वर्ष कला व तृतीय वर्ष कला :-

बी. ए. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जाताना विद्यार्थी प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रथम वर्षाच्या दोन विषयात अनुत्तीर्ण असल्यास त्यास ए. टी. के. टी. च्या नियमानुसार द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल. द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जाताना द्वितीय वर्षाच्या जास्तीत जास्त दोन विषयात अनुत्तीर्ण असलेला विद्यार्थी प्रवेशास पात्र होईल. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### * प्रथम वर्ष वाणिज्य :-

या वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता १२ वी परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे किंवा पुणे विद्यापीठाने मान्य केलेल्या अन्य विद्यापीठाची किंवा अन्य मंडळाची समकक्ष परीक्षा इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### * द्वितीय वर्ष वाणिज्य व तृतीय वर्ष वाणिज्य :-

बी. कॉम. अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातून द्वितीय वर्षात जाताना विद्यार्थी प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. पुणे विद्यापीठाच्या ए. टी. के. टी. च्या नियमानुसार दोन थिअरी व एक प्रॅक्टीकल विषयात अनुत्तीर्ण असला तरी त्यास द्वितीय वर्षात प्रवेश घेता येईल. द्वितीय वर्षातून तृतीय वर्षात जाताना द्वितीय वर्षाच्या जास्तीत जास्त दोन थिअरी व एक प्रॅक्टीकल विषयात अनुत्तीर्ण असलेला विद्यार्थी प्रवेशास पात्र राहील. मात्र असा विद्यार्थी प्रथम वर्षाच्या सर्व विषयात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

### * प्रथम वर्ष विज्ञान :- एफ.वाय.बी.एस्सी (प्रथम वर्ष विज्ञान) एकूण गुण १२००

### * प्रवेश पात्रता :-

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी शास्त्र अथवा समकक्ष म्हणून पुणे विद्यापीठाने मान्यता दिलेली परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

## * विषय निवडी संबंधी माहिती *

खालील विषयांची दोन ग्रुप मध्ये विभागणी केलेली आहे, खालीलपैकी कोणताही एक ग्रुप निवडावा.

| अ ग्रुप | ब ग्रुप |
|---|---|
| १. भौतिक शास्त्र | १. रसायन शास्त्र |
| २. रसायन शास्त्र | २. प्राणी शास्त्र |
| ३. गणित | ३. वनस्पती शास्त्र |
| ४. इलेक्ट्रानिक्स/संख्याशास्त्र | ४. भुगोल |

टिप : प्रत्येक विषयास दोन थिअरी पेपर्स व एक प्रॅक्टीकल असा अभ्यासक्रम असेल.

## * प्रवेश घेताना करावयाच्या कागद पत्रांची पुर्तता.

### (अ) प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान :-

१) विहीत नमुन्यातील पूर्ण भरलेला प्रवेश अर्ज.

२) विहीत नमुन्यातील पुणे विद्यापीठ पात्रता अर्ज.

३) मागील उत्तीर्ण परीक्षेचे मुळ गुण पत्रक व त्याच्या दोन प्रमाणित सत्य प्रती.

४) शाळा सोडल्याचा मुळ दाखला व त्याच्या दोन प्रमाणित सत्य प्रती.

५) स्टॅप आकाराचे अलीकडे काढलेले दोन फोटो.

६) आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी फी सवलतीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज.
रूपये १ लाख उत्पन्न असल्याचा तहसिलदाराचा दाखला आवश्यक.

७) जातीचा दाखला (फक्त मागासवर्गीयांसाठी)

८) उत्पन्नाचा दाखला (०१/०४/१७ ते ३१/०३/२०१८) '४ या कालावधीचा)
बी.सी. स्कॉलरशिप, एस.सी., एस.टी. प्रवर्गासाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये २ लाख आहे व एन.टी./ओबीसी./एस.बी.सी. प्रवर्गासाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये १ लाखा पर्यंत आहे. (तहसिलदाराचा दाखला)

९) अन्य शिष्यवृत्त्यांचे अर्ज (पात्रता असल्यास)

१०) पासींग सर्टिफिकेट व वर्तणूकीचा दाखला (फक्त अन्य विद्यापीठ किंवा मंडळाकडून येणाऱ्यासाठी)

११) फी भरल्याचे चलन.

१२) शिष्यवृत्तीचा अर्ज ऑन लाईन भरून त्याची प्रिंट आऊट महाविद्यालयात जमा करणे.

## (ब) द्वितीय व तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान :-

१) विहीत नमुन्यातील पूर्ण भरलेला प्रवेश अर्ज.
२) मागील उत्तीर्ण परीक्षेचे मुळ गुण पत्रक व त्याच्या दोन प्रमाणित सत्य प्रती.
३) पुणे विद्यपीठा अंतर्गत येणाऱ्या अन्य महाविद्यालयातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यास स्थानांतर दाखला (टी. सी.) व त्याच्या दोन प्रमाणित सत्य प्रती.
४) अन्य विद्यापीठातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्थानांतर व स्थलांतर (मायग्रेशन) दाखला व त्याच्या दोन-दोन प्रमाणित सत्य प्रती.
५) ओळखपत्रासाठी स्टँपचे अलीकडे काढलेले दोन फोटो.
६) आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांसाठी फी सवलतीचा नुतनिकरणाच्या अर्जाचा विहीत नमुना. रूपये १ लाख उत्पन्न असल्याचा तहसिलदाराचा दाखला.
७) जातीचा दाखला (फक्त मागासवर्गीयांसाठी) उत्पन्नाचा दाखला (०१/०४/२०१७ ते ३१/०३/२०१८) या कालावधीचा बी.सी. स्कॉलरशिप, एस.सी., एस.टी. प्रवर्गासाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये २ लाख आहे व एन.टी./ओबीसी./एस.बी.सी. ासाठी उत्पन्नाची मर्यादा रूपये १ लाखा पर्यंत आहे. (तहसिलदाराचा दाखला)
८) अन्य शिष्यवृत्त्यांचे अर्ज (पात्रता असल्यास)
९) पासींग सर्टिफिकेट व वर्तणूकीचा दाखला (फक्त अन्य विद्यापीठातून येणाऱ्यांसाठी)
१०) फी भरल्याचे चलन.

## * प्रवेश रद्द केल्यास परत मिळणारे शुल्क :-

प्रवेश घेतल्यानंतर तो रद्द करण्याचा रितसर अर्ज किती दिवसात महाविद्यालयास दिल्यास किती आणि कोणते शुल्क परत करावे हे विद्यापीठाने पुढील प्रमाणे निश्चित केलेले आहे.

| दिवस | परत करावयाचे शुल्क व त्याचे प्रमाण |
|---|---|
| १० | ८०% शैक्षणिक शुल्क आणि १००% इतर सर्व शुल्क |
| १५ | ६५% शैक्षणिक शुल्क आणि ०% इतर सर्व शुल्क |
| १५ दिवसानंतर | कोणतेही शुल्क परत मिळणार नाही. किंबहुना प्रथम सत्राची फी भरणे आवश्यक. |

## * स्कॉलरशिप्स :-

१) भारत सरकारची 'नॅशनल मेरीट स्कॉलरशिप्स'.
२) राज्य सरकारची 'गव्हर्नमेंट ओपन मेरीट स्कॉलरशिप्स'.
३) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना मिळणारी 'फ्रिडम फायटर स्कॉलरशिप्स'.
४) राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना.
५) नॅशनल लोन स्कॉलरशिप्स (भारत सरकारची राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती).
६) प्रायमरी व सेकंडरी टीचर्स चिल्ड्रेन्स स्कॉलरशिप्स.

७) अपंग विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती.

८) भारत सरकारची हिंदी शिष्यवृत्ती.

९) जिल्हा परिषदेची क्रिडा शिष्यवृत्ती.

१०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी भारत सरकारची स्कॉलरशिप.

११) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

१२) राजर्षी शाहु शिष्यवृत्ती योजना.

## * फ्रिशिप्स (फी माफी) :-

१) इ. बी. सी. फी माफी (आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणारी फी माफी.)

२) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी फी माफी.

३) बी. सी. फ्रिशिप्स.

४) सैनिक माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत.

५) अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकाच्या मुला मुलींना मिळणारी फी माफी.

वरील शिष्यवृत्ती सवलतीचे अर्ज प्रवेश घेतेवेळी किंवा जास्तीत जास्त ३१ जुलै पूर्वी देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यास एका वेळी जास्तीत जास्त एक स्कॉलरशिप / एक फ्रिशिप्स घेता येईल.

## * विद्यार्थ्यांसाठी असलेली योजना व उपक्रम :-

१) पुणे विद्यापीठाची विद्यार्थी सुरक्षा विमा योजना.

पुणे विद्यापीठ प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रती वर्षी रु. १०/- घेऊन त्या बदल्यात विद्यार्थ्यांना सुरक्षा विमा योजनेचे आणि आपत्कालीन मदत योजनेचे खालील प्रमाणे लाभ मिळतात.

अ) या योजने अंतर्गत विद्यापीठातील आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या अपघाती सुरक्षा विमा उतरविला जातो. त्यानुसार अपघात प्रसंगी विद्यार्थ्यास नियमानुसार जास्तीत जास्त रु. २५०००/- पर्यंत आर्थिक मदत दिली जाते.

ब) जर दुर्देवाने विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यु झाला तर त्याच्या कायदेशीर पालकास रु. २५०००/- ची आर्थिक मदत दिली जाते.

क) गंभीर व सामान्य आजाराच्या प्रसंगीही आर्थिक मदत दिली जाते.

२) कमवा व शिका योजना : महाविद्यालयातील गरीब व होतकरु व गरजू विद्यार्थ्यासाठी महाविद्यालयात कर्मवीर भाऊराव पाटील 'कमवा व शिका योजना' राबविली जाते. विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे कामाचा मोबदला दिला जातो.

३) पुणे विद्यापीठाची विशेष मार्गदर्शन योजना : महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी आणि शैक्षणिक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष मार्गदर्शन योजना राबविली जाते.

४) राष्ट्रीय सेवा योजना : विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयातील २०० विद्यार्थी या योजनेअंतर्गत सहभागी करुन घेतले जातात. या योजने अंतर्गत 'पाणी अडवा पाणी जिरवा' , 'ग्रामसफाई', 'वनीकरन', 'महाविद्यालय परिसर स्वच्छता', 'अंधश्रध्दा निर्मुलन', 'एडस् विषयी जनजागृती', 'व्यसनमुक्ती', 'रक्तदान शिबीर', 'आरोग्य शिबीर', 'पशुचिकित्सा शिबीर', 'पल्स पोलिओ अभियान', 'वैचारीक प्रबोधन', 'व्यक्तिमत्त्व विकास' असे विविध उपक्रम राबविले जातात.

५) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन : आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांस विविध क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन विभागा तर्फे विविध उपक्रम राबविले जातात. तज्ञांचे मार्गदर्शन स्पर्धा परीक्षा, क्विज इत्यादी उपक्रम राबविले जातात.

६) सांस्कृतीक उपक्रम : सांस्कृतीक विभागातर्फे वाद, वक्तृत्व, निबंध, गायन, काव्यवाचन, मेहंदी, रांगोळी, सुंदर हस्ताक्षर, नृत्य, अभिनय, वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषक वितरण, फनफेअर, फनिगेम्स, फिशिपॉण्ड्स असे कार्यक्रम राबविले जातात.

७) वाङ्‌मय मंडळ : मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयांचे वाङ्‌मय मंडळ महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेले आहे. या उपक्रमाअंतर्गत नाट्यवाचन, कथाकथन, काव्यवाचन, मुकाभिनय इत्यादी उपक्रम राबविले जातात.

८) नेचर क्लब : परिसंस्था, परिस्थितीकी, पर्यावरण, प्रदुषण, साधनसंपदा, वृक्षारोपन संवर्धन या विषयी विद्यार्थ्यांना अद्ययावत माहिती देणे या उद्देशाने या उपक्रमाची स्थापना केली आहे.

९) भित्तीपत्रक : दि. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दोन दिवशी 'प्राजक्त' हे महाविद्यालयाचे भित्तीपत्रक वर्षातून दोन वेळा प्रसिध्द केले जाते. तसेच प्रसंगानुरुप जादा अंक प्रकाशीत केले जातात.

१०) ग्रामिण भागातील कलाकारांना वाव देण्यासाठी विशेष उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थी व ग्रामिण भागातील कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तालुक्यातील विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

११) व्याख्याने चर्चासत्रे : प्रत्येक विभागात विविध विषयांच्या तज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. तसेच विषयाच्या अनुषंगाने चर्चासत्रांचे आयोजन केले जाते.

१२) शाळा महाविद्यालय समुह योजना : परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामध्ये महाविद्यालयाच्या वतीने प्राध्यापकांची मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात. शाळा – महाविद्यालयामध्ये कबड्डी, खो-खो अशा क्रिडा प्रकाराचे आयोजन केले जाते.

१३) पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजना : या योजने अंतर्गत विद्यापीठ स्तरावरील चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली जातात.

१४) क्रिडा विभागातील उपक्रम : विद्यार्थ्यांच्या क्रिडा नैपुण्यास संधी मिळण्यासाठी आंतर महाविद्यालयीन, आंतर विभागीय व आंतर विद्यापीठ क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यामध्ये विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

१५) विद्यार्थी व्यक्तीमत्व विकास केंद्राच्या माध्यमातून सॉफ्ट स्कील डेव्हलपमेंट प्रोग्रॅमचा लाभ दिला जातो.

* **<u>परिक्षा पध्दती</u> :-** प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष व तृतिय वर्ष बी. ए. / बी. कॉम. या वर्गाच्या परीक्षा २००८ परीक्षा पध्दतीने होतील.

विद्यापीठ नियमानुसार प्रथम वर्ष बी. ए. / बी. कॉम. या वर्गासाठी प्रथम सत्राच्या शेवटी सत्रांत परीक्षा (Term End Exam) राहील व ती ६० गुणांची राहील. ६० पैकी मिळालेले गुण २० गुणात रुपांतरीत होतील. या वर्गाची वार्षिक परीक्षा शैक्षणिक वर्षाच्या शेवटी महाविद्यालयाकडून घेतली जाईल व ती ८० गुणांची असेल या परीक्षेत किमान ४० टक्के (३२ गुण) मिळणे आवश्यक राहील. सत्रांत परीक्षेचे २० गुण व वार्षिक परीक्षेचे ८० गुण यात मिळालेल्या गुणांचा एकत्रित निकाल जाहीर होईल. त्यामुळे या दोन्ही परीक्षेत मिळून किमान ४० गुण मिळणे आवश्यक आहे.

प्रथम वर्ष विज्ञान वर्गाची परीक्षा विद्यापीठाच्या नियमानुसार घेतली जाईल.

वरील परीक्षांव्यतिरीक्त निरंतर मुल्यमापन पध्दती नुसार प्रत्येक विषयांची प्रत्येक सत्रात किमान दोन टयुटोरीअल्स देणे आवश्यक आहे.

## * <u>विद्यार्थ्यांसाठी नियम व सुचना</u> *

१) प्रवेश घेते वेळी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यास आपला प्रवेश रद्द समजला जाईल.

२) महाविद्यालयात प्रवेश घेताना सादर केलेला शाळा सोडल्याचा दाखला अथवा टी. सी. ची मुळ प्रत परत मिळणार नाही. प्रवेश घेताना सादर केलेली गुणपत्रिकेची मुळ प्रत योग्य वेळी परत केली जाते व तशी सुचना फलकावर लावली जाते.

३) एकदा प्रवेश घेतल्यावर आपण घेतलेला विषय बदलावयाचा असल्यास त्यासाठीचा विहीत नमुन्यातील, विहीत शुल्कासह अर्ज दि. १५ जुलै पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

४) आपणास दिलेला प्रवेश, पात्रतेच्या वा अन्य कारणाने विद्यापीठाने अमान्य केल्यास प्रवेश आपोआप रद्द होईल.

५) प्रत्येक विद्यार्थ्याने दिलेल्या मुदतीत फी भरणे आवश्यक आहे.

६) महाविद्यालयाचे तास सुरु असताना कोणत्याहीविद्यार्थ्यास कोणत्याही सबबीवर वर्गाबाहेर जाता येणार नाही तसेच वर्गाबाहेर राहता येणार नाही.

७) महाविद्यालयाच्या परिसरात प्रत्येक विद्यार्थ्याजवळ आपले ओळखपत्र असणे आवश्यक आहे व ते मागता क्षणी दाखवणे आवश्यक आहे. ओळखपत्र हरविल्यास दुसऱ्या ओळखपत्रासाठी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या शुल्कासह सादर करणे बंधनकारक राहील.

८) १५ ऑगस्ट (स्वातंत्र दिन) व २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) व राष्ट्रीय सणांना प्रत्येक विद्यार्थ्याची उपस्थिती अनिवार्य राहील. गैरहजर विद्यार्थ्यांवर महाविद्यालयाने केलेली कारवाई बंधनकारक राहील.

९) महाविद्यालयातील होणाऱ्या विविध कार्यक्रमात व व्याख्यानांना सूचनेप्रमाणे उपस्थित राहणे आवश्यक आहे.

१०) ग्रंथालय वापरासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांस एक वेगळे कार्ड दिले जाईल. एका कार्डावर एकावेळी एक अभ्यासाचे क्रमिक पुस्तक व एक संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन दिले जाईल. ग्रंथालयातील पुस्तके व्यवस्थित वापरुन ती वेळेवर परत करणे आवश्यक आहे अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल.

११) परीक्षा काळात कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीस ॲक्ट युनिं/ बोर्ड ॲण्ड अदर स्पेशीफाईड एक्सासमिनेशन्स ऑर्डीनन्स १९८२ कायद्यान्वये तो विद्यार्थी त्या शिक्षेस पात्र राहीलच परंतु, त्याच बरोबर त्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द करण्याचा, क्रिडा स्पर्धेत भाग घेण्यास मनाई करण्याचा, इतर उपक्रमांत प्रवेश न देण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

१२) महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी प्राचार्य, प्राध्यापक व इतर कर्मचारी वर्गाशी सभ्यतेचे वर्तन करावे व त्यांनी केलेल्या सुचनांचे काटेकोर पालन करावे. असभ्य वर्तन किंवा सूचनांचे उल्लंघन यासाठी योग्य ती शिक्षा करण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.

१३) प्रत्येक विद्यार्थ्याने महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ, सुंदर व सुरक्षित राहील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.
१४) महाराष्ट्र शासनाच्या आदेशान्वये महाविद्यालयाच्या आवारात गुटखा, तंबाखू सेवन व धुम्रपान यास प्रतिबंध करण्यात आला आहे. त्याचे उल्लंघन झाल्यास योग्य ती कारवाई केली जाईल.
१५) विद्यार्थी परिषद निवडणूक ही नवीन विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार घेतली जाईल.
१६) वार्षिक स्नेहसंमेलन घेणे अथवा न घेणे याबाबत महाविद्यालयाचा निर्णय अंतिम राहील.
१७) विद्यापीठ परिपत्रक क्र. १५३ / १९८८ नुसार व विद्यापीठ अधिनियम १५७ नुसार विद्यार्थ्याने महाविद्यालयात वा महाविद्यालयाबाहेर योग्य वर्तन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याने गैरवर्तन केल्यास अधिनियमातील तरतुदीची अंमलबजावनी केली जाईल. प्रसंगी विद्यार्थ्यावर निलंबनाची किंवा बडतर्फीची कारवाई केली जाईल.
१८) महाविद्यालयात कोणताही कार्यक्रम घ्यावयाचा असल्यास किंवा महाविद्यालय परिसरात कोणत्याही संघटनेची भित्तीपत्रके लाववायची असल्यास किंवा पत्रके वितरीत करावयाची असल्यास प्राचार्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगी शिवाय केलेली कृती हा शिस्तभंग समजला जाईल व योग्य ती कारवाई केली जाईल.
१९) महाविद्यालयातील कोणताही कार्यक्रम शिस्तीने व शांततेने पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक विद्यार्थ्याची आहे. याबाबत काही अयोग्य प्रकार आढळल्यास योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार महाविद्यालयास राहील.

वरील सुचना व नियमामध्ये बदल अथवा दुरुस्ती करण्याचा व त्याबाबतीत निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार प्राचार्यांना असून या बाबतीत कोणत्याही तक्रारीची नोंद घेतली जाणार नाही.

## * विद्यार्थ्यांसाठी विशेष सुचना *

१) प्रत्येक विद्यार्थ्याची किमान ७५ % उपस्थिती अनिवार्य असून तेवढी उपस्थिती न भरल्यास त्याला विद्यापीठ परीक्षेचा फॉर्म भरता येणार नाही. त्याची शिष्यवृत्ती व इतर सवलती रद्द केल्या जातील त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार असणार नाही.

२) प्रथम वर्ष या वर्गात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांस राष्ट्रीय सेवा योजना किंवा शारीरीक शिक्षण यापैकी एका उपक्रमात सहभागी होणे अनिवार्य आहे.

३) प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी सक्तीची आहे.

४) महाविद्यालयाच्या विविध सूचना फलकावर लावलेल्या सूचना दररोज वाचणे आवश्यक आहे. मी सूचना वाचली नाही या कारणाने होणाऱ्या नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

५) एखाद्या विद्यार्थ्याने किंवा विद्यार्थ्यांच्या गटाने रॅगींगचा प्रयत्न केल्यास त्या विद्यार्थ्यास किंवा गटास महाविद्यालयातून काढून टाकले जाईल. महाविद्यालयाचे यश, निकोप वाढ व उच्च परंपरा निर्माण करण्याची आपणा सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी सूज्ञपणे सहकार्याने आपण सर्वांना एकत्रितरित्या पार पाडावयाची आहे.

## ARTS FACULTY

### F.Y.B.A.

1) Compulsory English
2) Marathi OR Hindi
3) Politics
4) Economics OR Psychology
5) Geography OR General English
6) History

### S.Y.B.A.

1) Compulsory English
2) 2 to 4 General Subjects Any three Subjects Offered at FYBA (From No. 2 to 6)
3) 5 to 6 special Subjects Any one subject from the General Subject above

### T.Y.B.A.

1) Compulsory English
2) 2 to 4 General Subjects

* General Subject Offered at SYBA Will remain the same

3) 5 to 6 special Subjects

* Special subject offered at SYBA will remain the same

## COMMERCE FACULTY

### F.Y.B.Com.

1) Functional English
2) Financial Accounting
3) Business Economics (Micro)
4) Commercial Maths and Stats OR Computer concepts and Programming.
5) Banking & Finance OR Office Management
6) Consumes Protection & Business Ethics OR Commercial Geography
7) Marathi OR Hindi

### S.Y.B.Com.

1) Business Communicatior
2) Corporate Accounting
3) Business Economics
4) Principles & Functions of Managment
5) Corporate Law
6) Special Subject Paper 1 (Any one)
   a) Banking & Finance

### T.Y.B.Com.

1) Business Regulatory Frame Work (M.Law)
2) Adv. Accunting
3) Indian & Global Econonics Development OR International Economics.
4) Auditing & Taxation
5) Banking & Finance II
6) Banking & Finance III

## SCIENCE FACULTY

### F.Y.B.Sc.

Any One of the following groups.

**Group 1**

1) Physics
2) Chemistry
3) Mathematics
4) Statistics

**Group 2**

1) Physics
2) Chemistry
3) Mathematics
4) Electronics

**Group 3**

1) Physics
2) Chemistry
3) Botany
4) Zoology

**Group 4**

1) Chemistry
2) Botany
3) Zoology
4) Geography

Special Note : Student of S.Y.B.A., B.Com. Class has to complete "Course in Environment Awareness" in at least 'C' Grade.

## Table Showing The Annual Fees (2018-19)
## Faculty of Arts

| Sr. No. | Particulars of Fee | F.Y.B.A. | | | S.Y.B.A. | | | T.Y.B.A. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Paying | EBC | BCS / BCF | Paying | EBC | BCS / BCF | Paying | EBC | BCS / BCF |
| 1 | Admission Fee | 20 | 10 | - | 20 | 10 | - | 20 | 10 | - |
| 2 | Tution Fee | 800 | - | - | 800 | - | - | 800 | - | - |
| 3 | Student Activities Fee | 1000 | 995 | 975 | 1000 | 995 | 975 | 1000 | 995 | 975 |
| 4 | Library Fee | 100 | 90 | 50 | 100 | 90 | 50 | 100 | 90 | 50 |
| 5 | Gymkhana Fee | 100 | 80 | 50 | 100 | 80 | 50 | 100 | 80 | 50 |
| 6 | Poor Boy's Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 7 | Student Welfare Fund | 50 | 50 | - | 50 | 50 | - | 50 | 50 | - |
| 8 | Medical Check up Fee | 30 | 30 | - | - | - | - | - | - | - |
| 9 | Eligibility & Form Fee | 150 | 150 | 50 | - | - | - | - | - | - |
| 10 | Registration Fee | 25 | 25 | - | 25 | 25 | - | 25 | 25 | - |
| 11 | College Development Fund | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 12 | Student Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | Disaster Fund | 20 | 20 | - | 20 | 20 | - | 20 | 20 | - |
| 14 | Ashwamedh Contribution | 30 | 30 | - | 30 | 30 | - | 30 | 30 | - |
| 15 | Term End Exam fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 16 | Envirnment Awareness | - | - | - | 220 | 220 | 220 | - | - | - |
| 17 | Library Coution Money | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 18 | Coution Money | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 19 | Computerization Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| | **TOTAL Rs.** | **3300** | **2455** | **2100** | **3340** | **2495** | **2270** | **3120** | **2275** | **2050** |

**Note :** Geography Special Student Should pay Rs. 125/- as a Practical Fee.
Non-Grant Student Should pay Rs. 3900/- as a Tution Fee.

## Table Showing The Annual Fees (2018-19) Faculty of Commerce

| Sr. No. | Particulars of Fee | F.Y.B.Com. | | | S.Y.B.Com. | | | T.Y.B.Com. | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Paying | EBC | BCS / BCF | Paying | EBC | BCS / BCF | Paying | EBC | BCS / BCF |
| 1 | Admission Fee | 20 | 10 | - | 20 | 10 | - | 20 | 10 | - |
| 2 | Tution Fee | 800 | - | - | 800 | - | - | 800 | - | - |
| 3 | Student Activities Fee | 1000 | 995 | 975 | 1000 | 995 | 975 | 1000 | 995 | 975 |
| 4 | Library Fee | 100 | 90 | 50 | 100 | 90 | 50 | 100 | 90 | 50 |
| 5 | Gymkhana Fee | 100 | 80 | 50 | 100 | 80 | 50 | 100 | 80 | 50 |
| 6 | Poor Boy's Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 7 | Student Welfare Fund | 50 | 50 | - | 50 | 50 | - | 50 | 50 | - |
| 8 | Medical Check up Fee | 30 | 30 | - | - | - | - | - | - | - |
| 9 | Eligibility & Form Fee | 150 | 150 | 50 | - | - | - | - | - | - |
| 10 | Registration Fee | 25 | 25 | - | 25 | 25 | - | 25 | 25 | - |
| 11 | College Development Fund | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 12 | Student Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 13 | Disaster Fund | 20 | 20 | - | 20 | 20 | - | 20 | 20 | - |
| 14 | Ashwamedh Contribution | 30 | 30 | - | 30 | 30 | - | 30 | 30 | - |
| 15 | Term End Exam Fee | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 16 | Envirnment Awareness | - | - | - | 220 | 220 | 220 | - | - | - |
| 17 | Commerce Practical Fee | 40 | 40 | 40 | 80 | 80 | 80 | 120 | 120 | 120 |
| 18 | Commerce Laboratory Fee | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 | 150 |
| 19 | Library Coution Money | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| 20 | Coution Money | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 | 300 |
| 21 | Computerization Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| | **TOTAL Rs.** | **3490** | **2645** | **2290** | **3570** | **2725** | **2500** | **3390** | **2545** | **2320** |

**Note :** The Student who have taken the C.C.P. Subject shall pay Additonal Fee Rs. 500/-
Non-Grant Student Should pay Rs. 3900/- as a Tution Fee.

## Table Showing The Annual Fees (2018-19) Faculty of Science (Un-aided)

| Sr. No. | Particulars of Fee | F.Y.B.Sc. | | S.Y.B.Sc. | | T.Y.B.Sc. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Paying | BCS / BCF | Paying | BCS / BCF | Paying | BCS / BCF |
| 1 | Admission Fee | 20 | - | | | | |
| 2 | Tution Fee | 5200 | - | | | | |
| 3 | Student Activities Fee | 1000 | 975 | | | | |
| 4 | Library Fee | 100 | 50 | | | | |
| 5 | Gymkhana Fee | 100 | 50 | | | | |
| 6 | Poor Boy's Fund | 10 | 10 | | | | |
| 7 | Student Welfare Fund | 50 | - | | | | |
| 8 | Medical Check up Fee | 30 | - | | | | |
| 9 | Eligibility & Form Fee | 150 | 50 | | | | |
| 10 | Registration Fee | 25 | - | | | | |
| 11 | College Development Fund | 125 | 125 | | | | |
| 12 | Student Insurance | 10 | 10 | | | | |
| 13 | Disaster Fund | 20 | - | | | | |
| 14 | Ashwamedh Contribution | 30 | - | | | | |
| 15 | Term End Exam Fee | 300 | 300 | | | | |
| 16 | Labaratory Fee | 9200 | 9200 | | | | |
| 17 | Computerization Fee | 30 | 30 | | | | |
| 18 | Internal Assessment | 200 | 200 | | | | |
| 19 | Library Coution Money | 200 | 200 | | | | |
| 20 | Coution Money | 300 | 300 | | | | |
| 21 | Labaratory Coution | 300 | 300 | | | | |
| | **TOTAL Rs.** | **17400** | **11800** | | | | |

# महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग व विभाग

| अ.नं. | विभाग | नांव |
|---|---|---|
| १) | वाणिज्य | १) प्राचार्य, आर. बी. सुर्यवंशी M.Com<br>२) प्रा. ए. एम. कांबळे, विभाग प्रमुख M.Com<br>३) प्रा. डॉ. डी. एच. मोरे M.Com M. Phil. Ph.D.<br>४) प्रा. एम्. जी. जाधव M.Com B. Ed. |
| २) | इंग्लिश | १) प्रा. एम. के. कदम, विभाग प्रमुख M.A.P.G.D.T.E.<br>२) प्रा. व्ही. आर. बुवा M.A.P.G.D.T.E., SET.<br>३) प्रा. पी. एस. शिंदे M.A.SET. |
| ३) | हिंदी | १) प्रा. डी. ई. मिसाळ, विभाग प्रमुख M.A.B.Ed.<br>२) प्रा. डॉ. आर. आर. साळुंके M.A.B.Ed.SET. Ph.D. |
| ४) | मराठी | १) प्रा. आर. डी. शिंदे, विभाग प्रमुख M.A.<br>२) प्रा. डॉ. व्ही. व्ही. केसकर M.A.NET. Ph.D. |
| ५) | इतिहास | १) प्रा. एच. यु. काझी, विभाग प्रमुख M.A.DHE.<br>२) प्रा. डी. सी. गुळीग M.A.SET. |
| ६) | भूगोल | १) प्रा. डॉ. आर. पी. पाखरे, विभाग प्रमुख M.A.SET. Ph.D. |
| ७) | राज्यशास्त्र | १) प्रा. ए. एस. चव्हाण, विभाग प्रमुख M.A.M.Phil. |
| ८) | अर्थशास्त्र | १) प्रा. बी. बी. भापकर, विभाग प्रमुख M.A.B.Ed.<br>२) प्रा. व्ही. आर. काळे M.A. |
| ९) | मानसशास्त्र | १) प्रा. आर. एन. डांगे M.A.M.Phil. |
| १०) | शारिरिक शिक्षण | १) प्रा. एस. एन. भैरट B.Sc.M.P.Ed. SET. |
| ११) | ग्रंथालय | १) प्रा. पी. एच. कड M.A. M.Lib. |

## महाविद्यालयातील अधिकारी व प्रशासकीय सेवक

| अ.नं. | नांव | पद/विभाग |
|---|---|---|
| १) | प्रा. आर. बी. सुर्यवंशी | प्राचार्य |
| २) | श्री. एस. बी. कदम | कार्यालय अधिक्षक B.A. |
| ३) | श्री. जी. व्ही. जाधव | मुख्य लिपीक B.Com. |

| अ.नं. | नांव | पद/विभाग |
|---|---|---|
| ४) | श्री. एम. एल. वाघमारे | वरिष्ठ लिपीक B.Com.L.L.B. |
| ५) | श्री. ए. जी. चव्हाण | कनिष्ठ लिपीक B.A. |

## ग्रंथालय परिचर / शिपाई

६) श्री. एम. व्ही. ननवरे
७) श्री. डी. एस. ढोपे
८) श्री. एम. बी. भादेकर
९) श्री. एस. डी. सुर्यवंशी
१०) श्री. एस. ए. भंडलकर
११) श्री. एस. बी. जाधव
१२) श्रीमती आर. एस. दणाणे

# इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठान

मु. पो. निमसाखर, ता. इंदापूर, जि. पुणे.

## ❊ व्यवस्थापक मंडळ ❊

| अ.नं. | नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती आनंदी विश्वासराव रणसिंग | अध्यक्षा |
| २) | मा. हणमंतराव बाजीराव मोरे | उपाध्यक्ष |
| ३) | मा. अण्णासाहेब माधवराव हेगडे (बी.एस्सी.ॲग्री) | सचिव |
| ४) | मा. हणमंतराव कृष्णाजी रणसिंग | खजिनदार |
| ५) | मा. शिवाजीराव पांडुरंग रणवरे | सदस्य |
| ६) | मा. प्रकाश बुवासाहेब कदम | सदस्य |

## ❊ शाखा विस्तार ❊

- कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळंब-वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे.
- माध्यमिक विद्यालय, म्हसोबाचीवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे.
- माध्यमिक विद्यालय, तावशी, ता. इंदापूर, जि. पुणे.

प्रकाशक : प्राचार्य, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कळंब-वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे.

(मुद्रक : किरण ऑफसेट, जंक्शन मो. ९८९०९५३६२०, ९८९०९४९३५८)